सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१/302 दिनांक:- 27 JAN 2021

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, विनाअनुदानित ,
पदवी/पदव्युत्तर व पदविका संस्था,
नागपूर विभाग. नागपूर

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदविका तसेच व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित आर्थिकदृष्या मागास प्रवर्गातील (EBC)विद्यार्थ्याच्या शैक्षणिक शुल्काबाबत.

संदर्भ :-१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परीपत्रक क्र. ईबीसी-२०१८/प्र.क्र. ३८/तांशि-४ दि. १४ फेब्रुवारी, २०१८

२) मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.०२अ/एडीएम /2021 /३९ दि. २२/०१/२०२१

उपरोक्त विषयांन्वये आपणास कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश (CAP) घेणा-या आर्थिकदृष्या मागास प्रवर्गातील (EBC)विद्यार्थ्यांना शासनाकडून शैक्षणिक शुल्कांची ५० टक्के रक्कम शिष्यवृत्तीमार्फत प्रदान करण्यांत येते. **त्यामुळे संस्थांनी उमेदवारांकडून प्रवेशाच्या वेळी संबंधित शासन परीपत्रकांत नमुद केल्यानुसार देय शुल्क घेण्यांत यावे.**

प्रस्तुत प्रकरणी संस्थांकडून उमेदवारांना अनुज्ञेय शिष्यवृत्ती विचारात न घेता शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास आपल्या संस्थेविरूध्द कार्यवाही करण्याचे निर्देशित करण्यात आलेले आहे. तरी याबाबतची नोंद संस्था प्राचार्यानी घ्यावी.(संदर्भिय पत्र संलग्न)

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

**आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४**
मंत्रालय विस्तार भवन,मादाम कामा मार्ग ,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई .४०००३२
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१८

**परिपत्रक :**

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने / विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सदर ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्तीची रक्कम पात्र विद्यार्थ्यांना बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

२. राज्यातील बऱ्याचशा शिक्षण संस्था आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शिक्षण शुल्क भरण्याचा आग्रह धरतात किंबहूना १०० टक्के शिक्षण शुल्क भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देत नाहीत, अशा तक्रारी विद्यार्थ्याकडून , पालकांकडून, विविध संघटनांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे वारंवार प्राप्त होत असतात. वास्तविक प्रवेशाच्यावेळी अशा विद्यार्थ्यांकडून फक्त त्यांच्या हिश्श्याची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी घेणे अपेक्षित आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम शासनाकडून शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे व तद्नंतर विद्यार्थ्यांनी ती शिक्षण संस्थांमध्ये भरणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने याव्दारे सूचित करण्यात येते की, सर्व संबंधीत शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची १०० टक्के रक्कम अथवा पूर्ण रक्कम विद्यार्थ्यांनी भरावी असा आग्रह धरु नये. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम भरण्याचा आग्रह करण्यात येऊ नये. तसेच ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शिक्षण शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश

देणे क्रमप्राप्त आहे. अशा पध्दतीने शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा सक्त सूचना याव्दारे देण्यात येत आहेत. ही बाब संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय व संचालक, कला संचालनालय यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शिक्षण संस्थांच्या कटाक्षाने निदर्शनास आणावी. याउपर अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधीत संस्थांना समज द्यावी व आवश्यकता वाटल्यास संस्थांविरुध्द कारवाई करावी.

३. सदर परिपत्रकास सर्व प्रसिध्दी माध्यमांव्दारे संबंधीत संचालकांनी प्रसिध्दी द्यावी. तसेच संचालनालयांच्या संकेत स्थळांवर हे परिपत्रक जाहिर करावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१३११५५५७०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Madan
Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2efbf911362ce57b361b7f36471cb98eb98ed47e7de8b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2018.02.14 13:17:49 +05'30'

( म.मा.मोरवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
३. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
७. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
८. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये
९. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये